विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे" या योजनेंतर्गत शाळेची निवड करण्याबाबत.
मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चांदुर बाजार संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोळविहार ता. मोर्शी जि.अमरावती.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२०/योजना-३**
**मोती महल, २ रा मजला, १९५, जे.टाटा रोड,**
**चर्चगेट,मुंबई -४०० ०२०.**
**दिनांक- २१ मे, २०२६**

**वाचा:-**
१) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९/योजना-३, दिनांक १५.१०.२०२४
२) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९ (०१)/योजना-३, दिनांक १४.०५.२०२५
३) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. संकीर्ण-२०२५/ प्र.क्र.३२/ योजना-३, दिनांक ०४.१२.२०२५
४) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा., पुणे यांचे पत्र क्र.इमावबकसं/गेसईमाप्र- योजना/नविन मान्यता/२०२५-२६/११५४, पुणे दिनांक- २४.०२.२०२६

**प्रस्तावना :-**

आदिवासी विकास विभागामार्फत अनसूचित जमातींसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर विशेष मागास प्रवर्गातील "गोवारी" समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यास मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २९.०४.२०२५ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुषंगाने विशेष मागास प्रवर्गातील "गोवारी" समाजाच्या अंदाजे ६००० विद्यार्थ्यांना दरवर्षी इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिली पासून इयत्ता बारावी पर्यंत शिक्षण देण्यास संदर्भ क्र.२ येथील दिनांक १४.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी संदर्भाधिन क्र. ४ येथे नमूद दिनांक २४.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चांदुर बाजार संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोळविहार ता. मोर्शी जि.अमरावती या शाळेची उक्त योजनेंतर्गत निवड करुन सदरहू शाळेस गोवारी समाजातील विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विहित प्रपत्रांसह (शाळेला प्राप्त एकूण गुणांकन ८९ ) शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने गोवारी समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी

माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रवेश देण्यासाठी मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चांदुर बाजार संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोळविहार ता. मोर्शी जि.अमरावती या शाळेची निवड करुन सदरहू शाळेला सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यास संबंधित शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थ्यांना शहारांतील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रवेश देण्यासाठी मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चांदुर बाजार संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोळविहार ता. मोर्शी जि.अमरावती या शाळेची निवड करण्यास व सदरहू शाळेला खालील तक्त्यात नमूदप्रमाणे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील १०० विद्यार्थ्यांना प्रवेशित करण्यास संबंधित शासन निर्णयामधील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव | शाळेला प्राप्त गुणांकन | सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्य विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| **मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चांदुर बाजार संचलित** | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोळविहार ता. मोर्शी जि.अमरावती** | ८९ | १०० |

१. नामांकित शाळेत प्रवेश देताना खालील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे :-

१) संबंधित संस्था/शाळेस संदर्भाधिन शासन निर्णय, दिनांक १४.०५.२०२५ मधील निकषांची,तसेच शासन निर्णय दिनांक ०४.१२.२०२५ मधील अतिरिक्त निकषांची, अटी, शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील. संबंधित संस्था / शाळेकडून संबंधित शासन निर्णयातील निकषांची, अटी शर्तींची पूर्तता होत असल्याची खातरजमा करुन संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी विद्यार्थी वाटपाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

२) संदर्भाधिन शासन निर्णय, दिनांक १४.०५.२०२५ मधील प्रपत्र-अ (२) १ वसतिगृहविषयक अनिवार्य निकषामधील अ.क्र.१ प्रमाणे, संबंधित शाळेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी निवासाची व्यवस्था स्वतंत्र इमारतीमध्ये असणे आवश्यक आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी निवासाची व्यवस्था स्वतंत्र इमारतीमध्ये नसल्यास अशी व्यवस्था विहित कालावधीत करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

३) नामांकित निवासी शाळा योजनेच्या अनुषंगाने शाळेची तपासणी करावी. तसेच शाळेत प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड पडताळणी करुन नोंदणी करावी. तद्नंतर प्रत्यक्ष उपस्थित लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या व प्रत्यक्ष निवासी विद्यार्थी संख्या याची खातरजमा करुन शासन निर्णय, दिनांक १४.०५.२०२५ व शासन निर्णय दिनांक ०४.१२.२०२५ मधील अटी-शर्तीनुसार सविस्तर अहवाल प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग यांच्या मान्यतेने निधी वितरणासाठी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचे मार्फत शासनास सादर करावा.

४) सदर योजनेंतर्गत विद्यार्थी मंजूरीबाबत संबंधित संस्था / शाळा मार्फत शासनास सादर प्रस्तावात नमूद सर्व सोयी सुविधा देण्यास संस्था तयार आहे, याची संबधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी खातरजमा करावी व संस्थेसोबत तसा करारनामा करण्यात यावा.

५) संस्था / शाळेमार्फत विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थ्यांसाठी वेगळी तुकडी / वर्ग सुरु करणे अपेक्षित नाही, शाळेमध्ये सुरु असलेल्या नियमित तुकडी / वर्गामध्येच इतर विद्यार्थ्यांसमवेत योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण देणे बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांसाठी वेगळी तुकडी / वर्ग सुरु केल्याचे आढळल्यास संबंधित संस्था / शाळेवर गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात येईल व शाळेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल.

६) संस्थेतील प्रवेशित मुलींच्या वसतिगृहात महिला अधिक्षिका व केअर टेकर यांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. याची पूर्तता न झाल्याचे आढळल्यास शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल.

७) सदर योजनेंतर्गत शासनाने मान्यता दिलेल्या शाळांमध्येच आणि संबंधित शाळेकरीता मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येच्या मर्यादेतच विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थी प्रवेशित करण्याबाबत संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी दक्षता घ्यावी.

८) योजनेच्या मूळ तरतुदीनुसार, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १.०० लक्ष एवढ्या कमाल मर्यादेत असणाऱ्या पाल्यांनाच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.

९) संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी विद्यार्थी प्रवेशित करताना जवळच्या शाळेमध्ये तसेच संबंधित प्रकल्पातील निवड करण्यात आलेल्या शाळांना प्राधान्य देऊन विद्यार्थी प्रवेशाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी.

१०) एखाद्या प्रकल्प कार्यक्षेत्रातील निवड करण्यात आलेल्या शाळा व त्यामध्ये मंजूर विद्यार्थी संख्या यापेक्षा योजनेंतर्गत प्रवेशाकरीता प्राप्त अर्जांची संख्या जास्त असल्यास संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी विद्यार्थ्यांची निवड ड्रॉ पध्दतीने करुन निवड यादी जाहीर करावी. तसेच निवड न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द करावी. प्रकल्पामधील निवड करण्यात आलेल्या शाळेमध्ये या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

११) सदर योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या नामांकित शाळांच्या संस्थाचालक / मुख्याध्यापक यांच्या समवेत संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी शैक्षणिक

वर्षाच्या प्रथम व द्वितीय सत्रामध्ये बैठक घेऊन प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत आढावा घ्यावा.

१२) नामांकित योजनेंतर्गत शाळेची निवड झाल्यानंतर पहिल्या सत्रात दोन वेळा, तसेच द्वितीय सत्रात दोन वेळा संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी अचानक नामांकित शाळांना व्यक्तीशः भेट देऊन सदर शाळेमधील सौहार्दपूर्ण वातावरण, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, औषधोपचार, शैक्षणिक दर्जा, पोषण इत्यादी सर्व बाबींबाबतचा अहवाल संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

१३) संदर्भाधिन, शासन निर्णय दिनांक १४.०५.२०२५ व शासन निर्णय दिनांक ०४.१२.२०२५ मधील विहित तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. सदर तरतुदींचे पालन न करणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्यात येईल.

१४) सदर शासन निर्णयानुसार नामांकित योजनेंतर्गत मान्यता रद्द करण्यात आलेल्या शाळांमधील विद्यार्थी तसेच शासकीय इंग्रजी माध्यमाच्या श्रेणी वाढ नसलेल्या शाळांमधील विद्यार्थी तसेच शासकीय इंग्रजी माध्यमाच्या श्रेणीवाढ नसलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना इतरत्र समायोजित करण्यात यावे, असे समायोजन संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी करावे व संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत अहवाल शासनास सादर करावा.

१५) नामांकित योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या नामांकित शाळेमध्ये विद्यार्थी प्रवेशित करताना ज्या इयत्तेत विद्यार्थी प्रवेशित करावयाचे आहेत. अशा इयत्तेत संबंधित शाळेमध्ये नामांकित योजने व्यतिरिक्त प्रवेशित इतर विद्यार्थीसंख्येच्या समप्रमाणाच्या कमाल मर्यादेत राहतील याची दक्षता घेण्यात यावी. (नामांकित योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थी कमाल ५० टक्के योजने व्यतिरिक्त प्रवेशित इतर विद्यार्थी किमान ५० टक्के)

२. नामांकित शाळांची यादी तयार करण्यासाठी शाळेची स्थापना कधी झाली, शाळेत देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा, शाळांचे मागील तीन वर्षांचे निकाल तसेच त्यांचे मागील ३ वर्षांचे बँक स्टेटमेंट, शाळांमध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिकविण्यात येणाऱ्या इतर बाबी, मागील ३ वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल, शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती अथवा घेतलेले व्यावसायिक शिक्षण इ. बाबीची माहिती विचारात घेऊन जिल्हास्तरीय छाननी समितीने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडे प्रस्ताव अग्रेषित करावेत. संचालक यांनी त्यांच्या कार्यालयास प्राप्त प्रस्ताव (प्रादेशिक विभागनिहाय) स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह शासनास विनाविलंब मान्यतेस्तव सादर करावेत. सदर समितीने उत्तम नामांकित शाळांची छाननी करावी व त्यानुसार सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या आवडीनुसार / प्राधान्यानुसार संबंधित विद्यार्थ्यास नामांकित शाळेत इयत्ता १ ली ते १२ वी मध्ये प्रवेश मिळवून द्यावा.

३. नामांकित शाळेच्या नियमानुसार विद्यार्थ्यांसाठी रेनकोट, भोजन, निवास खर्च, ट्युशन फी, सुरक्षा अनामत, शिक्षण शुल्क इत्यादीसाठी देय रक्कम संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांच्यामार्फत संबंधित नामांकित निवासी शाळेस अदा करण्यात यावी. सदरचे शुल्क संबंधित विद्यार्थी इयत्ता १२ वी उत्तीर्ण होईपर्यंत देय राहील, मात्र सदर विद्यार्थी दरवर्षी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील, विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यानंतर त्याला नामांकित शाळेतून काढून टाकण्यात यावे. विद्यार्थ्यांची देखभाल, शिक्षण, आरोग्य व प्रगती यांची संपूर्ण जबाबदारी संबंधीत नामांकित शाळेची राहील. सदर योजनेची योग्य अंमलबजावणी करून योजना सफल करण्याची जबाबदारी संबंधित सहायक संचालक व प्रादेशिक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांची राहील. समितीद्वारे नामांकित शाळांची अंतिम निवड झाल्यानंतर निवड झालेल्या शाळेबरोबर रीतसर करारनामा करण्यात यावा.

४. नामांकित योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या शाळांमार्फत बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार, अधिनियम, २००९ व त्याअंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदींची तसेच इयत्ता १ ली मध्ये प्रवेशासाठी बालकाच्या किमान वयाबाबत शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे.

५. सदर योजनेची अंमलबजावणी संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण करतील तसेच प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग या योजनेचे“पर्यवेक्षकीय अधिकारी” म्हणून व संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे हे “नियंत्रक अधिकारी” म्हणून जबाबदारी पार पाडतील.

६. सदर योजनेसाठी होणारा खर्च “मागणी क्र. झेडजी-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण (२) (२९) गोवारी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये प्रवेश देणे (कार्यक्रम) ३४, शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने, (२२२५जी ५६४)” या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या आर्थिक अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२११३०७१५२२३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRIYA ANIRUDDHA DESHPANDE
Date: 2026.05.21 13:09:11 +05'30'

**( प्रिया देशपांडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) सचिव (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

३) जिल्हाधिकारी, अमरावती.

४) मा.महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर

५) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६) प्रादेशिक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग) विभाग, अमरावती.

७) सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, अमरावती.

८) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती

९) श्री. कैलाश राऊत, अध्यक्ष, गोवारी योजना अंमलबजावणी व संनियंत्रण समिती.

१०) अध्यक्ष/सचिव, मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चांदुर बाजार संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोळविहार ता. मोर्शी जि.अमरावती

११) निवडनस्ती (योजना-३)